वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ६०१९ /२०२४ दिनांक :- २५च /०८ /२०२४

-: प्रसिध्दीपत्रक :-

**वीर गोगादेव उत्सवानिमित्ताने पुणे कॅम्प भागात करण्यात येणा-या वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत**

दिनांक २७/०८/२०२४ रोजी वीर गोगादेव उत्सवानिमीत्त पुणे कॅम्प येथील न्यू मोदीखाना येथून मुख्य मिरवणूक सायंकाळी १६.०० वा.चे सुमारास निघणार आहे त्यामध्ये मोठ्या प्रमाणात नागरीक सामिल होत असतात सदर मिरवणूक दरम्यान वाहतूकीची कोंडी होऊ नये व वाहनचालकांची गैरसोय होऊ नये, सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे ,पोलीस उप आयुक्त, वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकतेनुसार व तेथील वाहतुकीच्या परिस्थितीनुसार वाहतुक व्यवस्थेमध्ये खालील प्रमाणे बदल करण्याबाबतचे आदेश निर्गमित करीत आहे.

## वीर गोगादेव मुख्य मिरवणूक मार्ग

**मिरवणुक मार्ग** :- दि. २७/०८/२०२४ रोजी १६.०० वा. लष्कर वाहतुक विभागातील न्यु मोदीखाना येथुन मिरवणुकीस सुरुवात होवुन न्यु मोदीखाना पुलगेट पोलीस चौकी - मेढी माता मंदीर - महात्मा गांधी रोडने डावीकडे वळुन कुरेशी मस्जिद - समोरुन सेंटर स्ट्रीट रोडने सरळ भोपळे चौक - सेंटर स्ट्रीट चौकी - उजवीकडे वळुन महावीर चौक - डावीकडे वळुन महात्मा गांधी रोडने कोहिनुर हॉटेल चौक ते पुलगेट पोलीस चौकी - मेढी माता मंदीर येथे विसर्जन होणार आहे.

**मिरवणूक सुरु झालेनंतर बंद करण्यात येणारे मार्ग व पर्यायी मार्ग -**

१. गोळीबार मैदान चौकातून वाय जंक्शनमार्गे (पंडोल अपार्टमेंट) महात्मा गांधी रोडकडे येणारी वाहतुक ही वाय जंक्शन (पंडोल अपार्टमेंट) येथे बंद करुन ती खाणे मारुती चौक येथे वळविण्यात येणार आहे. तसेच सोलापूर रोडला जाणारी वाहतुक ही खाणे मारुती चौक येथून उजवीकडे वळून जाईल व शहरात येणारी वाहतुक ही खाणे मारुती चौकातून सरळ ईस्ट स्ट्रिट रोडने इंदीरा गांधी चौकातून डावीकडे वळून महावीर चौक व तेथून पुढे एम जी रोडकडे जाईल किंवा इंदिरा गांधी चौकातून उजवीकडे वळून लष्कर पोलीस स्टेशन चौक व तेथून डावीकडे वळून तीन तोफा चौकातून इच्छित स्थळी जाईल.

२. मुफ्ती फौज चौकातून कुरेशी मस्जिदकडे जाणारी वाहतुक बंद करुन सदरची वाहतुक ही चुडामन तालिमकडे वळविणेत येईल.

३. व्होल्गा चौकाकडून महमंद रफी चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदर वाहतुक सरळ ईस्ट स्ट्रिटने इंदिरा गांधी चौकाकडे सोडण्यात येईल.

४. महावीर चौकातून सरबतवाला चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक एम जी रोडने नाझ चौकाकडे वळविण्यात येईल.

५. सरबतवाला चौकाकडून महावीर चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतूक ताबुत स्ट्रिट रोड मार्गे पुढे सोडण्यात येईल.

६. बाबाजान चौकाकडून भोपळे चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदर वाहतुक शिवाजी मार्केटकडे वळविण्यात येईल.

७. बाबाजान चौकाकडून कुरेशी मस्जिदकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक निशांत टॉकीजकडे वळविण्यात येईल.

८. शिवाजीमार्केट कडून सेंटर स्ट्रीट चौकीकडे जाणारी वाहतुक तसेच कोळसा गल्लीकडून एमजी रोडकडे जाणारी वाहतुक ही वाहतुक परिस्थितीनुसार बंद करण्यात येईल.

CamScanner

सदर मिरवणुक मार्गावर वाहतूक **परिस्थितीनुसार/आवश्यकतेनुसार** बदल करण्यात येणार आहेत. तरी वाहनचालकांनी दिनांक- २७/०८/२०२४ रोजी सायं. १६.०० वा.पासून ते मिरवणूक संपेपर्यंत उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करुन, वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

**( अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर

**प्रत** :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर

CamScanner